# देगलूर महाविद्यालयाचे नॅकद्वारे मूल्यांकन

**देगलूर/ प्रतिनिधी**

अडत व्यापारी शिक्षण संस्था संचालित देगलूर महाविद्यालयास दि.२७ व २८ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय मुल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेच्या समितीने प्रत्यक्ष भेट देऊन मुल्यांकन केले. या समितीचे अध्यक्ष श्री उत्कल संस्कृती विद्यापीठ ,ओरिसाचे माजी कुलगुरू डॉ. कमल मिश्रा , सदस्य जम्मू व काश्मीर राज्याचे माजी उच्च शिक्षण संचालक डॉ जाहूर आहमद चाट व पंजाब राज्यातील एस.एस. एम. महाविद्यालय धीनानगरचे प्राचार्य डॉ. रामकुमार तुली या त्रिसदस्यीय समितीने मुल्यांकन केले.

यापूर्वी इ.स.२०१७ मध्ये झालेल्या मूल्यांकनात महाविद्यालयास इ++ चा दर्जा प्रदान करण्यात आला होता. गत ५ वर्षात महाविद्यालयाने केलेल्या अध्ययन, अध्यापन व संशोधन क्षेत्रात केलेली प्रगती पाहून तसेच विद्यार्थ्यांची वाढती गुणवत्ता ,क्रीडा, समाजसेवा , नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रम , निसर्गरम्य हरित परिसर व दर्जेदार भौतिक सुविधा पाहून समितीने समाधान व्यक्त केले.




महाराष्ट्र , कर्नाटक व तेलंगणा राज्याच्या सीमावर्ती भागातील मुला-मुलींना दर्जेदार उच्च शिक्षण देणारे ग्रामीण महाविद्यालय पाहून आनंद झाल्याची भावना समितीने समारोप कार्यक्रमात व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीबरोबर त्याच्या सर्वांगीण विकासाकडे मानवी दृष्टीकोणातून लक्ष देणारा प्राध्यापक वर्ग महाविद्यालयात कार्यरत असल्याचीही प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली. महाविद्यालयात सध्या शिकत असलेले विद्यार्थी, माजी विद्यार्थी संघ व पालक सभा यामध्ये देखील प्रत्येक व्यक्तीचा महाविद्यालयाविषयी जिव्हाळा असल्याचे समितीने व्यक्त केले

महाविद्यालयाचे नॅक (NAAC) द्वारे मुल्यांकन कार्याच्या पूर्वतयारीसाठी,महाविद्यालयातील सर्व विभाग व परिसर अद्ययावत करण्यासाठी अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, सचिव शशिकांत चिद्रावार ,उपाध्यक्ष नारायणराव मैलागिरे, सहसचिव सुर्यकांत नारलावार, कोषाध्यक्ष विलास तोटावार व कार्यकारिणी मंडळ सदस्य राजकुमार महाजन, डॉ.कर्मवीर उनग्रतवार , जनार्दन चिद्रावार ,गंगाधर जोशी, रवींद्र द्याडे, देवेन्द्र मोतेवार, चंद्रकांत नारलावार, प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयीन सर्व प्राध्यापक, कर्मचारी ,आजी व माजी विद्यार्थ्यांनी प्रयत्न केले. प्रस्तुत कामासाठी उपप्राचार्य डॉ.अनिल चिद्रावार, आयक्यूएसी समन्वयक डॉ. लक्ष्मण सुदाम, सहसमन्वयक डॉ. विनय भोगले ,उपप्राचार्य निवृत्ती गोविंदवार , पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील , कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी नळगीरकर यांच्यासह वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी वर्गाने प्रयत्न केल्याची माहिती प्राचार्य खताळ यांनी दिली.

Scanned with OKEN Scanner